**Q.P.Code: 29246**

**वेळ : २ तास** **गुण : ६०**

**सूचना** : १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

१. 'समीक्षा' ही संकल्पना स्पष्ट करून वाचन आणि विश्लेषण या समीक्षाव्यापारातील दोन महत्त्वाच्या पायऱ्यांचा परिचय करून द्या.

**किंवा**

'साहित्यकृतीचे अनेकांगी आकलन करून घेण्यासाठी एकापेक्षा अधिक समीक्षाविषयक दृष्टिकोनांचा आधार घ्यावा लागतो.' या विधानाची प्रस्तुतता पारखा.

२. समाजशास्त्रीय समीक्षाविचाराची तात्त्विक भूमिका सविस्तर विशद करा.

**किंवा**

'समाजशास्त्रीय समीक्षाचौकटीतून साहित्य आणि समाज यांच्यातील व्यामिश्र परस्परसंबंधांचा वेध घेता येतो.'- चर्चा करा.

३. मार्क्सच्या 'पाया इमला सिद्धांता'चा सविस्तर परामर्श घ्या.

**किंवा**

मार्क्सवादी समीक्षाविचारातील महत्त्वाची सूत्रे सांगून 'प्रतिबिंबवादी नमुनारूपा'चा परिचय करून द्या.

४. सदानंद देशमुख यांच्या 'लचांड' या कथेचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून परीक्षण करा.

**किंवा**

मकरंद साठे यांच्या 'चौक' नाटकाची समाजशास्त्रीय समीक्षा करा.

************************